# डिजिटल साक्षरता काळाची गरज

## देगलूरचे दिवाणी न्यायाधीश देव यांचे प्रतिपादन

**देगलूर/ प्रतिनिधी**

आधुनिक काळ हा डिजीटलायझेशनचा काळ असून सायबर गुन्ह्यापासून बचावासाठी डिजीटल साक्षरता काळाची गरज आहे, असे प्रतिपादन देगलूरचे दिवाणी न्या. राघवेंद्र एन. देव यांनी केले.

देगलूर महाविद्यालय देगलूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे येरगी येथे आयोजित विशेष युवक शिबीरातील कायदे विषयक मार्गदर्शन कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात ते बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे संतोष पाटील उपस्थित होते. सदर कार्यक्रम हा तालुका विधी सेवा समिती, अभियोक्ता संघ, देगलूर व देगलूर महाविद्यालय देगलूरच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास मार्गदर्शक ॲड.एम.जी.देशमुख यांनी अंमली पदार्थांचे सेवन व त्याचे दुष्परिणाम या बाबत तर ॲड.एम.एम. इनामदार यांनी तालुका विधी सेवा समिती बाबत माहिती, ॲड.एन.जी. सुर्यवंशी यांनी




भारतीय राज्यघटने बाबत माहिती दिली. ॲड.देवकते,ॲड.पाटील, ॲड.अब्दुल रझाक, ॲड.योगेश इंगोले,ॲड.देशमुख,ॲड.योगेश्वर वरखिंडे,ॲड.चंद्रकांत देशमुख, ॲड.वाय.एस.मंत्री या विधी तज्ज्ञांनी महसुली कायदे, वारसाहक्क कायदे, वैवाहिक कायदे ,मोटार वाहतूक नियमांची कायदे, माहिती तंत्रज्ञान कायदा, पोक्सो ॲक्ट, रॅगिंग प्रतिबंध कायदा याबाबत सविस्तर माहिती देऊन जनजागृती केली. समारोपाच्या भाषणात न्या राघवेंद्र एन.देव यांनी डिजिटल साक्षरता, सायबर गुन्हा म्हणजे काय सांगून सायबर गुन्ह्यांचे स्वरूप आणि अशा गुन्ह्यांपासुन बचाव कसा करावा याबाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय देबडे यांनी केले. सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ.व्यंकट खंदकुरे व आभार डॉ.रत्नाकर लक्षटे यांनी मानले. या कार्यक्रमाची सांगता भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका वाचन करून करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. गणेश क्यादारे, प्रा.शिवचरण गुरुडेसह विद्यार्थी व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner